# प्रकरण ४.
# नियोजन




## ❖ व्याख्या :-

- **डॉ. डाल्टन** - "आर्थिक नियोजन म्हणजे पूर्वनियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संसाधनाच्या मालकांनी जाणीवपूर्वक घेतलेले निर्णय, आर्थिक क्रियांना जाणीवपूर्वक दिलेली दिशा."

- **डिकिनसन** - "संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या पाहणीनंतर, आढावा घेतल्यानंतर शासनाने मूलभूत आर्थिक प्रश्नासंबंधी घेतलेले निर्णय अथवा उपलब्ध साधनसंपत्तीचे विविध क्षेत्रात वाटप."

## ❖ नियोजन :-

- जगात सर्वप्रथम नियोजनाचा स्वीकार रशियाने १९२८ मध्ये केला.
- भारताने नियोजनाचा स्वीकार रशियाकडून केला आहे.
- भारतीय नियोजनाचे जनक श्री.एम. विश्वैश्वरय्या आहेत.
- विश्वैश्वरय्या हे म्हैसूर संस्थानात इंजिनिअर होते.
- विश्वैश्वरय्या यांनी "Planned Economy for India" हे पुस्तक १९३४ साली लिहिले यात त्यांनी १० वर्षासाठी आर्थिक विकास कार्यक्रम भारतासाठी सुचविला आहे.
- भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने राष्ट्रीय नियोजन आयोगाची स्थापना १९३८ मध्ये जवाहरलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली केली.
- भारतातील आठ उद्योगपतींनी १९४४ मध्ये बॉम्बे प्लॅन मांडला व त्यात १५ वर्षीय नियोजनाची संकल्पना मांडली हा प्लॅन टाटा – बिर्ला प्लॅन म्हणून ही ओळखला जातो.
- गांधी योजना १९४४ साली श्रीमान नारायण यांनी मांडली.
- जनता योजना १९४५ एम् . एन्. रॉय. यांनी मांडली.
- सर्वोदय योजना जय प्रकाश नारायण यांनी १९५० मध्ये मांडली.
- नियोजन आयोगाची स्थापना १५ मार्च १९५० मध्ये बिगर - घटनात्मक म्हणून झाली. पंतप्रधान हे नियोजन आयोगाचे अध्यक्ष असतात व उपाध्यक्ष दैनंदिन कामकाज पाहतात.
- राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना ६ ऑगस्ट १९५२ रोजी झाली.
- पहिली पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९५१ पासून सुरु झाली.

## ❖ नियोजनाचे प्रकार (Types of Planning) :-

- नियोजनाचे प्रकार हे आर्थिक व्यवस्था, भौगोलिक स्थिती, साधनांचा किंवा वेळेच्या दृष्टिकोनातून केले जातात. नियोजन हे देशाच्या आर्थिक व्यवस्थेनुसार समाजवादी, भांडवलशाही किंवा लोकशाही प्रकारचे असते. खालील काही महत्त्वाचे नियोजनाचे प्रकार आहेत.



### १. वित्तीय नियोजन :-
- ''वित्तीय नियोजनाचा अर्थ असा आहे. की, मागणी व पुरवठा यांच्यात असा समन्वय साधला जावा की, किंमत रचना न बदलता भौतिक लक्ष्ये साध्य केली जाते.
- नियोजन हे पैशाच्या संदर्भात केले जाते.
- पैशाच्या साहाय्याने भौतिक उद्दिष्टये साध्य केली जाते.

### २. सूचक नियोजन आणि आदेशात्मक नियोजन :-
- सूचक नियोजन फ्रान्समध्ये सुरु आहे.
- सूचक नियोजन लवचिक असते.
- आदेशात्मक नियोजनामध्ये नियोजन प्राधिकरण निश्चित करते की वस्तूची किंमत किती असावी? कोणत्या वस्तूचे उत्पादन घ्यावे? किती गुंतवणूक करावी हे निश्चित करते. हे नियोजन अलवचिक असते. अशा अर्थव्यवस्थेत गडबड होण्याचा धोका अधिक असतो. सूचक नियोजनामध्ये खाजगी व सार्वजनिक दोन्ही क्षेत्राची उपस्थिती असते.
- सूचक नियोजन फ्रान्समध्ये१९४७ मध्ये भोने योजनेपासून केले जात आहे.
- आदेशात्मक नियोजनामध्ये सर्व आर्थिक क्रिया ह्या सरकारच्या आदेशानुसार चालतात.
- आदेशात्मक नियोजनामध्ये उपभोक्त्याला उपभोग स्वातंत्र नसते. आदेशात्मक नियोजन चीनमध्ये आहे.

### ३. लोकशाही नियोजन :-
- लोकशाही नियोजन म्हणजे लोकांद्वारे केले जाणारे नियोजन होय.
- भारतीय नियोजन हे लोकशाही प्रकारचे आहे. या नियोजनात लोकांना संपत्तीचा अधिकार असतो.
- सरकार काही संपत्तीचे राष्ट्रीयकरण करते. सरकार मौद्रिक व राजकोषीय धोरणाद्वारे सार्वजनिक व खाजगी क्षेत्रावर नियंत्रण ठेवते. लोकांच्या कल्याणात वाढ करणे हे या नियोजनाचे मुलभूत उद्दिष्ट असते.
- देशातील लोकांना आर्थिक, सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक स्वातंत्र्य असते.

### ४. सर्वाधिकारशाही नियोजन :-
- या नियोजनात सर्व आर्थिक क्रिया या केंद्रीय सत्तेकडून नियंत्रित केल्या जातात.
- उपभोग, उत्पादन, वितरण आणि विनिमय यावर राज्यांचे नियंत्रण असते.
- नियोजन समितीत जे धोरण स्वीकारले जाते त्याचा स्वीकार केला जातो.
- संपूर्ण देशातील लोकांना करावा लागतो.

### ५. प्रादेशिक नियोजन :-
- प्रादेशिक नियोजनाचा विचार प्रवर्तक म्हणून स्टॉलिन ओळखला जातो.
- इंग्लंडने प्रादेशिक नियोजनाचा स्वीकार १९३७ मध्ये केला.
- प्रादेशिक नियोजन हे राष्ट्रीय योजने अंतर्गत कार्यान्वित केले जाते. त्यामुळे एका प्रदेशाच्या आवश्यकतेनुसार किंवा लोकसंख्येच्या आवश्यकतेनुसार गरजा पूर्ण केल्या जातात.
- तीव्र आर्थिक विकास, समतोल विकास व राष्ट्रीय सुरक्षितेच्या दृष्टीने या नियोजनाला विशेष महत्त्व आहे.

### ६. सरकते नियोजन (Rolling Plan) :-
- रोलींग प्लॅनचा जनक प्रोफेसर गुन्नार मिर्डाल हा आहे. त्याने (Indian Economic Planning in its Broader setting) या पुस्तकात विकसनशील देशांसाठी रोलींग प्लॅनची शिफारस केली.
- भारतात रोलींग प्लॅनचा वापर प्रथम जनता सरकारने १ एप्रिल १९७८ मध्ये केला. नंतर १ एप्रिल १९८० मध्ये इंदिरा सरकारने त्याचा त्याग केला. या नियोजनामुळे संसाधनांचा वापर पर्याप्त करणे शक्य आहे.
- गरजेनुसार धोरणात बदल शक्य
- दीर्घकालीन प्रकल्पांसाठी हे नियोजन उपयुक्त आहे. समतोल सामाजिक विकास करण्यास मदत होते.

### ७. भांडवलशाही नियोजन :-
- या नियोजनात किंमती बाजार यंत्रणेद्वारे निश्चित होतात.
- उत्पादन, वितरण, उपभोग व विनिमय यावर सरकारचे नियंत्रण नसते.
- अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचे वर्चस्व असते.
- याप्रकारच्या नियोजनात तेजी किंवा मंदी सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.
- मक्तेदारी गरजेनुसार सरकार अनेक लोकोपयोगी कामे करते.

### ८.समाजवादी नियोजन :-

- अशा प्रकारचे केंद्रीय मंडळाकडून केले जाते.
- आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण केंद्रीय नियोजन प्राधिकरणाकडे असते.
- वितरण, उत्पादन, विनिमय, उपभोग, किंमती इत्यादी बाबत सरकार निर्णय घेते.

## भारतात आर्थिक नियोजनाची आवश्यकता

- समाजाची गरज लक्षात घेऊन उत्पादन कार्य करण्यासाठी
- साधनसामग्रीचा योग्य उपयोग होण्यासाठी
- व्यापार चक्रांवर नियंत्रण राखण्यासाठी
- जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी
- संतुलित आर्थिक विकासासाठी, मागास प्रदेश व मागास वर्गांच्या विकासासाठी
- व्यक्तिगत हित आणि सामाजिक हित यांमध्ये समन्वय साध्यण्यासाठी
- गळेकापू स्पर्धेचे उच्चाटन करण्यासाठी
- आर्थिक व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी
- वर्गसंघर्षास पायाबंद घालण्यासाठी
- देशातील नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय थांबवून तिचा चांगला उपयोग करुन घेण्यासाठी
- लोकांना काम मिळावे, रोजगाराच्या विपुल संधी निर्माण व्हाव्यात व बेकारीचे निर्मूलन करता यावे यासाठी
- वेगाने देशातील उत्पादन क्षमतेची निर्मिती करुन भांडवल निर्मितीचा दर वाढविण्यासाठी
- अशा रितीने, सरकारला अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेऊन जलद आर्थिक विकासाबरोबरच आर्थिक, सांपत्तिक व प्रादेशिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेस दिशा घेता यावी यासाठी भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या प्रक्रियेचा अवलंब केला.

### ❖ नियोजित अर्थव्यवस्था (Planned Economy) :-



विशिष्ट विकासात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राष्ट्रातील नैसर्गिक, भांडवली तसेच मानवी साधनसंपत्तीचा योजनाबध्द उपयोग करुन अर्थव्यवस्थेचे नियोजन करणे म्हणजे नियोजित अर्थव्यवस्था होय. समाजवादी अर्थव्यवस्थेचे हे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय होय. यामध्ये सर्व प्रकारच्या संसाधनांचा मालकी हक्क शासन व्यवस्थेकडे असतो व त्या संसाधनांच्या आधारे आर्थिक विकासाची जबाबदारी देखील शासन व्यवस्थेचीच असते.

Planning Commission
Government of India

### ❖ नियोजन आयोग (Planning Commission) :-

१५ मार्च १९५० रोजी पंडित नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाची पहिली बैठक २८ मार्च १९५० रोजी झाली. भारताचे पंतप्रधान हे नियोजन मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष असतात. परंतु मुख्य जबाबदारी ही उपाध्यक्षांची असते

**रचना** : नियोजन मंडळाची रचना, संदस्य संख्या तसेच सदस्य पात्रता इ. बाबी निश्चित नाही. सरकार आपल्या मर्जीप्रमाणे वेळोवेळी त्यात बदल घडवून आणते. या दृष्टीने नियोजन मंडळ हे पंतप्रधान कार्यालयाच्या (PMO) अधिनस्थ कार्य करते.

- अध्यक्ष : पंतप्रधान हे नियोजन मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष असतात.
- उपाध्यक्ष : हे नियोजन मंडळाचे पुर्णवेळ काम करणारे सदस्य असतात.
- काही कॅबिनेट मंत्री : उदा. नियोजन मंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री
- काही अर्थतज्ज्ञ व विचारवंत

२०१४ नंतर Planning comission बरखास्त झाले.

| CHAIRMANS OF PLANNING COMMISSION | |
|---|---|
| 1. Jawharlal Nehru | --- 1950 - 64 |
| 2. Lal Bahadur Shastri | --- 1964 - 66 |
| 3. Indira Gandhi | --- 1966 - 77 |
| 4. Morarji Desai | --- 1977 - 79 |
| 5. Charan singh | --- 1979 - 80 |
| 6. Rajiv Gandhi | --- 1984 - 89 |
| 7. V.P.Singh | --- 1989 - 90 |
| 8. Chandra Shekhar | --- 1990 - 91 |
| 9. P.V.Narashimha Rao | --- 1991 - 96 |
| 10. Atal Bihari Vajpayee | --- 1996 |
| 11. Deve Gowda | --- 1996 - 97 |
| 12. I.K.Gujral | --- 1997 - 98 |
| 13. Atal Bihari Vajpayee | --- 1998- 2004 |
| 14. Manmohan singh | --- 2004 - 2014 |

### ❑ स्वरुप:

१. असंवैधानिक किंवा घटनाबाहय – घटनेमध्ये नियोजन मंडळाचा उल्लेख नाही.
२. कायदेबाह्य – नियोजन मंडळाची स्थापना संसदेच्या कायद्याने झालेली नाही.
३. सल्लागार मंडळ – नियोजनाच्या बाबतीत केंद्रसरकारचे सल्लागारी मंडळ म्हणून कार्य करते.

### ❑ कार्ये :

१. देशातील नैसर्गिक, तांत्रिक व मानवी संसाधनांचा शोध घेणे. या संसाधनांचा संतुलित आणि परिणामकारक उपभोग करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करणे.
२. नियोजनाचे विविध टप्पे ठरविणे.
३. देशाच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गातील अडथळे सरकारला सूचित करणे.
४. योजनेचे वेळोवेळी परीक्षण करुन त्यात योग्य ते बदल सुचविणे.

## नीति आयोग (NITI) नॅशनल इन्स्टिटयुशन फॉर ट्रान्सफार्मिंग इंडिया




**नीति आयोग**

'राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था' म्हणजेच नीति आयोग. देशाचा आर्थिक नियोजनात गेली ६५ वर्षे कार्यरत असलेल्या नियोजन आयोगाची जागा १ जानेवारी २०१५ पासून 'नीति आयोगा'ने घेतली. नीति आयोग राज्य व केंद्र सरकारांना मार्गदर्शक व प्रोत्साहन म्हणून काम करेल. धोरणात्मक मुद्यांवर तांत्रिक सल्ला देण्याची भूमिका नीति आयोग पार पाडेल.

### ❑ रचना :

- स्थापना : १ जानेवारी २०१५
- पदसिध्द अध्यक्ष : पंतप्रधान नरेंद्र मोदी
- उपाध्यक्ष : डॉ. राजीव कुमार (अर्थतज्ज्ञ)
- नियामक परिषद : सर्व राज्याचे मुख्यमंत्री व केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल
- मुख्य कार्यकारी अधिकारी (सी. इ. ओ.) : अमिताभ कांत
- पूर्ण वेळ सदस्य :१) अर्थतज्ज्ञ (विवेक देबेरॉय)
  २) डॉ. व्ही. के. सारस्वत (माजी सचिव संरक्षण संशोधन आणि विकास DRDO चे माजी प्रमुख)
  ३) श्री. रमेश चंद (कृषी तज्ज्ञ)
- पदसिध्द सदस्य : १) राजनाथ सिंह - केंद्रिय मंत्री
  २) अरुण जेटली - केंद्रिय अर्थमंत्री
  ३) पियुष गोयल – रेल्वे मंत्री
  ४) राधा मोहन सिंग - कृषी मंत्री
- अर्धवेळ सदस्य : जास्तीत जास्त दोन देशांतील नामांकित विद्यापीठे अथवा संशोधन संस्थामधून निवड विशेष आमंत्रित :
  १) नितीन गडकरी २) धावरचंद गेहलोत ३) स्मृती इराणी

## नीति आयोगाची उद्दिष्टये

- आंतरक्षेत्रीय व आंतरविभागीय मुद्यांवर चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी आयोग काम करेल.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय 'थिंक टँक' आणि शैक्षणिक व धोरण संशोधन संस्थांना प्रोत्साहन देणे.
- राज्यांसमवेत वेळोवेळी संरचनात्मक सहकार्य करुन संघराज्य पध्दती दृढ करणे.
- गावपातळीवर योजना तयार करण्यासाठी तंत्र विकसित करुन हळूहळू उच्च स्तरावर त्याची अंमलबजावणी करणे.
- राज्यांना राष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार्याने व समानतेने सहभागी करुन घेण्यावर भर
- ८ फेब्रुवारी २०१५ रोजी नीति आयोगाची पहिली बैठक झाली. तर दुसरी बैठक – १५ जुलै २०१५

## ➢ नीति आयोगाची रचना :-

- पंतप्रधान नीति आयोगाचे प्रमुख Chairperson असतील.
- सर्व राज्याचे मुख्यमंत्री, ज्या केंद्रशासित प्रदेशामध्ये विधीमंडळे असतील तेथील मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांची मिळून बनलेली गव्हर्निंग कौन्सिल (Governing Council) असेल.
- एकापेक्षा अधिक राज्ये किंवा प्रदेशातील एखाद्या प्रश्नावर किंवा अकस्मित परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी पंतप्रधान प्रादेशिक परिषद (Regioanl Council) एका ठराविक कालावधीसाठी स्थापन करतील. प्रादेशिक परिषदेमध्ये त्या प्रदेशातील घटकराज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशाचे नायब राज्यपाल (Lt. Governer) यांचा समावेश असेल. प्रादेशिक परिषदेच्या अध्यक्षस्थानी पंतप्रधान किंवा त्यांनी नामनिर्देशित (nominee) केलेली व्यक्ती असतील.
- पंतप्रधानांद्वारे विशिष्ट विषयाचे ज्ञान असणारे, तज्ज्ञ, विशेषज्ञ आणि कार्यरत व्यक्ती यांचे विशेष निमंत्रित (special invitees) म्हणून नामनिर्देशन करण्यात येईल.निति आयोगाचे प्रमुख पंतप्रधान असतील आणि निति आयोगाच्या पूर्ण वेळ संघटनात्मक रचनेमध्ये पुढील घटकांचा समावेश असेल.
  १. उपाध्यक्ष : पंतप्रधानाद्वारे नेमणूक करण्यात येईल.
  २. पूर्ण वेळ सदस्य
  ३. आघाडीच्या विद्यापीठाचे संशोधन संस्थांचे किंवा त्या संदर्भातील ज्ञान असणारे दोन अर्धवेळ सदस्य
  ४. पदसिध्द अध्यक्ष : पंतप्रधानांद्वारे नामनिर्देशित जास्तीत जास्त चार केंद्रीय मंत्री
  ५. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) : सचिव दर्जाचे आणि निश्चित कालमर्यादेसाठी पंतप्रधानांद्वारे नेमणूक करण्यात आलेले अधिकारी
  ६. आवश्यकतेनुसार सचिवालय (Secretariat)
- पर्यावरणपूरक विकासावरच जबाबदार विकास प्रणाली अवलंबून आहे. भारत अत्यंत विविधता असलेले मोठे राष्ट्र आहे.
- राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासनाच्या भूमिकेमध्ये काळानुरुप बदल होऊ शकतो. परंतु राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेमधील शासनाची भूमिका कायम महत्त्वाची राहील.
- भारतातील परिणामकारक शासनासाठी (Effective Governance) पुढील स्तंभ महत्त्वाचे आहेत :-
  १. वैयक्तिक तसेच समाजाच्या आकांक्षापूर्तीसाठी लोकाभिमुख कार्यक्रम
  २. जनतेच्या गरजा ओळखून गरजांना कृतीशील प्रतिसाद
  ३. जनतेचा सहभाग
  ४. स्त्रियांचे सर्व क्षेत्रांमध्ये सक्षमीकरण
  ५. समाजातील सर्व घटकांची सर्वसमावेशकता
  ६. राष्ट्रातील तरुण-तरुणींना समान संधी
  ७. तंत्रज्ञानाचा वापर करुन पारदर्शकता निर्माण करणे आणि त्याद्वारे शासन अधिकाधिक प्रतिसादात्मक करण्याबरोबरच दृष्टीक्षेपामध्ये आणणे.

## नीति आयोगाची उद्दिष्टये

- बलशाली राज्यांद्वारे बलशाली राष्ट्रनिर्माण हे लक्षात घेऊन राज्यांबरोबर संरचनात्मक पुढाकार आणि यंत्रणाद्वारे सहकार्यात्मक संघराज्याची (Co-operative Federalism) निर्मिती करणे.
- राष्ट्रीय उद्दिष्टांवर आधारीत राज्यांच्या कृतिशील सहभागाद्वारे विविध क्षेत्रे, प्राधान्यक्रम आणि व्यूहरचना यासाठी सामूहीक दृष्टीकोन विकसित करण्यावर भर देणे.
- ग्रामीण स्तरावर खात्रीशीर योजनांची आखणी करुन या योजना एकत्रित करुन प्रगतीशीलरित्या शासनाच्या वरिष्ठ पातळीपर्यंत विकसित करणे.
- आर्थिक धोरण आणि व्यूहरचना आखणी राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताच्या दृष्टीने राहील याची खात्री करणे.
- आर्थिक प्रगतीचे लाभ समजातील सर्वांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील यावर विशेष लक्ष देणे.
- दीर्घकालीन धोरणे आणि कार्यक्रम यांची आखणी करणे आणि त्यांची प्रगती आणि कार्यक्षमता यावर देखरेख ठेवणे आणि यातून प्राप्त होणाऱ्या अभिप्रायाचा वापर सुधारणा अधिक नाविन्यपूर्ण करण्याच्या दृष्टीने करणे. आवश्यकता भासल्यास मध्यावधी दुरुस्ती सुचविणे.
- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील समविचारी विचार-प्रवर्तक-गट (Think Tank) शैक्षणिक संस्था, धोरणात्मक संशोधन करणाऱ्या संस्था यांच्या सहकार्यासाठी चालना देणे.राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ व्यक्ती यांच्या सहकार्याद्वारे ज्ञाननिर्मिती नाविन्यपूर्णता आणि उद्योजकता सहाय्य यंत्रणा उभारणी करणे.
- विकासाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक गतिमान करण्यासाठी आंतर-विभागीय आणि आंतर-क्षेत्रीय प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.
- सुशासन, शाश्वत आणि समताधिष्ठित विकासाच्या उत्कृष्ट कार्यक्रमाचे संशोधन केंद्र म्हणून कार्यरत राहून या बाबी संबंधित सर्व घटकांपर्यंत प्रसारीत करण्याचे कार्य करणे.
- कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण आणि क्षमतावृध्दी यावर लक्ष.

# राष्ट्रीय विकास परिषद (National Development Council - NDC)

### ❖ स्थापनेची गरज :

- पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत घटक राज्यांना सहभागी करुन घेण्यासाठी. नियोजन प्रक्रियेमध्ये घटकराज्यांना सामील करुन घेण्यासाठी ६ ऑगस्ट १९५२ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना करण्यात आली.
- राष्ट्रीय विकास परिषद ही नियोजन आयोगापेक्षाही व्यापक असून तिचा सल्ला नियोजन आयोगावर बंधनकारक असतो.
- पंतप्रधान तिचे अध्यक्ष असून केंद्रीय नियोजन आयोगाचे सचिव हेच तिचे सचिव असतात.

### रचना :

- १९६७ च्या आधी राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये फक्त पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांचा समावेश होता. १९६७ पासून राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये खालील सदस्य असतात.
- पंतप्रधान – राष्ट्रीय विकास परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष
- सर्व केंद्रीय कॅबिनेट मंत्री
- घटकराज्यांचे मुख्यमंत्री
- केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक
- नियोजन मंडळाचे सर्व सदस्य
- राष्ट्रीय विकास परिषद ही वर्षभर काम करणारी संस्था नाही. वर्षातून तिच्या कमीत कमी दोन सभा व्हाव्या अशी अपेक्षा असते.

### स्वरुप:-

- नियोजन आयोगाप्रमाणे राष्ट्रीय विकास परिषदेचे स्वरुप देखील असंवैधानिक किंवा घटनाबाह्य, कायदेबाह्य तसेच सल्लागारी स्वरुपाचे आहे.
- पंचवार्षिक योजना आराखड्याबाबत अंतिम निर्णय घेणारी ही सर्वोच्च व्यवस्था आहे.

## राष्ट्रीय विकास परिषदेची कार्ये

१. नियोजन आयोगाने निर्मिलेल्या आराखड्याचा अभ्यास करुन त्याला अंतिम रुप देणे.

२. राष्ट्रीय स्तरावरील नियोजनाचे वारंवार परीक्षण करणे.

३. आर्थिक विकासावर प्रभाव टाकणाऱ्या सामाजिक व आर्थिक धोरणांचा आढावा घेणे.

४. पंचवार्षिक योजनातील उद्दिष्टे, साध्य करण्यासाठी विविध शिफारशी करणे.

# पंचवार्षिक योजना (Five Year Planning)




आर्थिक नियोजनाच्या अमंलबजावणीचा मार्ग म्हणजे पंचवार्षिक योजना होय. यामध्ये सरकारच्या वित्तीय धोरणांना अनुसरुन आगामी पाच वर्षाच्या कालावधीसाठी आर्थिक विकासाची उद्दिष्टे निश्चित केली जातात. तसेच त्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी आवश्यक भांडवलाच्या उभारणीचे मार्ग देखील निश्चित केले जातात.


## पंचवार्षिक योजना (Five Year Plans)


| योजना | मान्यता देणारे शासन अध्यक्ष | योजनेचा कालावधी | प्रतिमान | आर्थिक वृध्दीदर लक्ष्य (टक्के) | प्रत्यक्ष वृध्दीदर (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | पंडित नेहरु | १९५१ ते ५६ | हेरॉल्ड-डोमर | २.१ | ३.५ |
| दुसरी | पंडित नेहरु | १९५६ ते ६१ | प्रा. महालनोबिस | ४.५ | ४.२७ |
| तिसरी | पंडित नेहरु | १९६१ ते ६६ | प्रा. महालनोबिस, एस. चक्रवर्ती | ५.६ | २.८ |
| सुट्टी योजना | इंदिरा गांधी | १९६६ ते ६९ | – | – | ३.९ |
| चौथी | इंदिरा गांधी | १९६९ ते ७४ | ॲलन-रुद्र | ५.७ | ३.२ |
| पाचवी | इंदिरा गांधी | १९७४ ते ७८ | ॲलन-रुद्र | ४.४ | ४.७ |
| सरकती योजना | मोरारजी देसाई | १९७८ ते ८० | प्रो. लकडावाला | – | – |
| सहावी | इंदिरा गांधी | १९८० ते ८५ | ॲलन-रुद्र | ५.२ | ५.५ |
| सातवी | राजीव गांधी | १९८५ ते ९० | वकील-ब्रम्हानंद | ५.० | ५.६ |
| आठवी | नरसिंह राव | १९९२ ते ९७ | राव-मनमोहनसिंग | ५.६ | ६.५ |
| नववी | अटल बिहारी वाजपेयी | १९९७ ते ०२ | गांधीवादी | ६.५ | ५.५ |
| दहावी | अटल बिहारी वाजपेयी | २००२ ते ०७ | गांधीवादी | ८.० | ७.७ |
| अकरावी | मनमोहन सिंग | २००७ ते १२ | गांधीवादी | ८.१ | ७.९ |
| बारावी | – | २०१२ ते १७ | – | ८.२ | – |

पहिल्या तीन योजनांमध्ये वाढीच्या दराचे लक्ष्य NNP च्या स्वरुपात ठरविण्यात आले होते. चौथ्या योजनेत ते NDP च्या स्वरुपात, तर त्यानंतर मात्र ते GDP च्या स्वरुपात ठरविण्यात येत आहे.

## ➢ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६) :-

- अध्यक्ष : पंडित जवाहरलाल नेहरु
- उपाध्यक्ष : गुलझारीलाल नंदा
- कालावधी : १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६
- प्रतिमान : हेरॉल्ड – डोमर
- मुख्य भर : कृषी क्षेत्रावर
- विकास दर : अपेक्षित – २.१ टक्के
- साध्य : ३.६ टक्के
- योजनेचे उपनाव : पुनरुत्थान योजना
- **हाती घेण्यात आलेले प्रकल्प :-**


पंडित जवाहरलाल नेहरु


गुलझारीलाल नंदा

१. २ ऑक्टोबर १९५२ पासून समुदाय विकास कार्यक्रमास (CDP) सुरुवात
२. दामोदर खोरे विकास योजना
३. भाक्रा-नानगल प्रकल्प, कोसी प्रकल्प
४. हिराकूड योजना-अमेरिकेतील टेनेसी खोरे प्रकल्पाच्या आराखड्यावर आधारित
५. सिंद्री येथे खत कारखाना
६. चित्तरंजन येथे रेल्वे इंजिनांचा कारखाना
७. पेराम्बूर येथे रेल्वे डब्यांचा कारखाना
८. हिंदुस्थान ॲंटिबायोटिक्स – पिंपरी, पुणे
९. HMT - बेंगलोर


कृषी क्षेत्र



भाक्रा-नानगल प्रकल्प


- १९५२ मध्ये हातमाग मंडळाची (१९५२) तर १९५३ मध्ये खादी व ग्रामोद्योग मंडळाची (KVIB) स्थापना करण्यात आली.
- २८ डिसेंबर १९५३ रोजी University Grant Commission (UGC) ची (कायदेशीर मान्यता १९५६) तर १९५१ मध्ये Indian Institute of Technology (IIT), Kharagpur ची स्थापना करण्यात आली. (Institute of Technology Act मात्र १९६१ मध्ये मंजूर झाला). १९ जुलै १९५५ रोजी इम्पीरियल बँकेचे राष्ट्रीयकरण करुन ‘स्टेट बँके’ची स्थापना करण्यात आली.

- **योजनेचे मूल्यमापन**
- अनुकूल मान्सून व तुलनेने कमी उद्दिष्टे यामुळे ही योजना जवळजवळ सर्व बाबतीत यशस्वी झाली.
- आर्थिक वृध्दी दर उद्दिष्ट केवळ २.१ टक्के असतांना प्रत्यक्षात ३.६ टक्के वृध्दी दर साध्य झाला.
- अन्नधान्याचे उत्पादन ५२.२ दशलक्ष टनांवरुन (१९५१-५२) ६५.८ दशलक्ष टनांपर्यंत (१९५५-५६) वाढले. कृषी उत्पादन २० टक्क्यांनी वाढले.
- अन्नधान्याचे उत्पादन मूळ उद्दिष्टांपेक्षा ३३ टक्के अधिक झाले.
- औद्योगिक उत्पादनात सुमारे ४० टक्क्यांनी वाढ झाली. कापड, साखर, कागद, यंत्रसामग्री इत्यादी उद्योगधंद्यात लक्षणीय प्रगती झाली. खते, रेल्वे इंजिन आणि रेल्वे वाघिणी, पेनिसिलीन, डी.डी.टी. हे उद्योग स्थापन झाले.
- मोठया प्रमाणावर जलसिंचन व ऊर्जेच्या पायाभूत सोयींना सुरुवात झाली.
- विकासासाठी आवश्यक ती संरचना निर्माण करण्यात बरेच यश मिळाले.

## ➢ दुसरी पंचवार्षिक योजना–(१९५६ ते १९६१) :-

- अध्यक्ष : पंडित जवाहरलाल नेहरु
- उपाध्यक्ष : पी. सी. महालनोबीस
- प्रतिमान : पी. सी. महालनोबीस / व्ही.टी. कृष्णामाचारी
- मुख्य भर : जड व मुलभूत उद्योग
- कालावधी : १९५६ ते १९६१
- विकास दर : अपेक्षित – ४.५टक्के
- साध्य विकास दर: ४.१ टक्के
- उपनाव : भौतिकवादी योजना / नेहरु – महालनोबीस योजना


पंडित जवाहरलाल नेहरु


पी. सी. महालनोबीस

- **हाती घेतलेले प्रकल्प :-**

१. भिलाई पोलाद प्रकल्प – रशियाच्या मदतीने - १९५९ मध्ये
२. रुरकेला पोलाद प्रकल्प – पश्चिम जर्मनीच्या मदतीने - १९५९ मध्ये
३. दुर्गापूर पोलाद प्रकल्प – ब्रिटनच्या मदतीने - १९६२ मध्ये
४. BHEL – (भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड) – भोपाळ
५. नानगल व रुरकेला हे दोन खत कारखाने
६. खादी व ग्रामोद्योग महामंडळाची (KVIC) स्थापना - कायदा १९५६ चा, परंतु प्रत्यक्ष कार्याला १ एप्रिल १९५७ पासून सुरुवात.


जड व मुलभूत उद्योग



BHEL – (भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड)


- **योजनेचे मूल्यमापन :-**


१. आर्थिक वाढीचा वार्षिक दर ४.२१ टक्के एवढा संपादित केला गेला.
२. पोलाद उद्योगांची विशेष वाढ झाली.
३. सामाजिक क्षेत्रात शिक्षण व आरोग्य सेवांमध्ये विशेष वाढ झाली.
४. कॉंग्रेसच्या आवडी अधिवेशनातील ठरावानुसार १९५६ पासून समाजवादी समाज रचनेचा स्वीकार केला गेला.
५. सुएझ कालव्याचा प्रश्न, मोसमी पावसाची कमतरता तसेच परकीय चलनाच्या साठ्यातील घट या सारख्या समस्यांना सामोरे जावे लागले.
६. या योजना काळात किंमत निर्देशांक ३० टक्क्यांनी वाढला.

- **राजकीय घडामोडी :**

१. सुवेझ कालव्याचा प्रश्न : १९५६ मध्ये इजिप्त आणि ब्रिटन यांच्यात सुवेझ कालव्याच्या मालकीच्या प्रश्नावर युध्द (Sinai war) पेटले. यामुळे भारताच्या परकीय व्यापारावर गंभीर परिणाम झाला.
२. महाराष्ट्र राज्य निर्मिती : मुंबई प्रांतात मराठी आणि गुजराती भाषिक प्रदेश मोडत होता. संयुक्त महाराष्ट्र समिती आणि महागुजरात समितीच्या आंदोलनांमुळे १ मे १९६० ला महाराष्ट्र आणि गुजरात राज्य कायद्यानुसार (Bombay Reorganisation Act) वेगवेगळी करण्यात आली.

## ➢ तिसरी पंचवार्षिक योजना –(१९६१ ते १९६६) :-


पंडित जवाहरलाल नेहरु


लाल बहादुर शास्त्री

- अध्यक्ष : पं नेहरु कालावधी ( १९६१ ते ६४)
  लाल बहादुर शास्त्री ( १९६४ ते ६६)
  तिसऱ्या योजनेला दोन अध्यक्ष लाभले होते.
- उपाध्यक्ष : व्ही. टी. कृष्णाम्माचारी
- प्रतिमान : महालनोबीस प्रतिमानावरील अधारीत सुखमॉय चक्रवर्ती यांच्या प्रसिद्ध लेखनावर अवलंबून होते.
- अपेक्षित विकास दर : ५.६टक्के
- साध्य विकास दर : २.३ टक्के
- उद्दिष्टे : अन्नधान्य उत्पादनात ६ टक्के तर औद्योगिक उत्पादनात १४ टक्के वार्षिक वृध्दीदर साध्य करणे.

हरितक्रांतीची सुरुवात

FCI


- **हाती घेतलेले प्रकल्प :-**

१. १९६४ – सघन कृषी क्षेत्र कार्यक्रम (IAAP)
२. १९६५ – भारतीय खाद्य महामंडळ (FCI) ची स्थापना
३. १९६५ – हरितक्रांतीची सुरुवात
४. १९६५ - कृषी मुल्य आयोगाची (APC) स्थापना (या आयोगाचे १९८५ मध्ये नाव बदलून कृषि मुल्य व किंमती आयोग असे करण्यात आले.)
५. १९६४ - आयडीबीआय व युटीआय ची स्थापना
६. परकीय आक्रमणे व दुष्काळ या सारख्या समस्यांमुळे या योजना काळात महत्त्वाचे फारसे प्रकल्प सुरु होऊ शकले नाहीत.

- **योजनेचे मूल्यमापन :-**

१. १९६२ चे चीन युध्द, १९६५ चे पाकिस्तान युध्द व १९६५-६६ चा भीषण दुष्काळ या तीन कारणांमुळे तिसरी योजना पूर्णपणे अपयशी ठरली. आत्तापर्यंतची ती सर्वाधिक अपयशी ठरलेली योजना आहे.
२. आर्थिक वृध्दीदर प्रत्यक्षात २.८ टक्के इतकाच साध्य झाला.
३. अन्नधान्याचे उत्पादन ८२ दशलक्ष टनाहून ७२ दशलक्ष टनापर्यंत कमी झाले.
४. १९६६-६७ मध्ये राष्ट्रीय उत्पन्न ४.२ टक्क्यांनी कमी झाले.
५. भारतीय अर्थव्यवस्था दिवाळखोर बनली. भारताला मदतीसाठी आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडे जावे लागले.
६. जून १९६६ मध्ये रुपयांचे ३६.५ टक्क्यांनी अवमूल्यन घडवून आणले.
७. दुष्काळामुळे अन्नधान्याच्या बफर साठयाचे महत्त्व लक्षात आल्याने सरकारने १९६५ मध्ये भारतीय खाद्य महामंडळ (FCI) ची स्थापना केली.

## ➢ तीन वार्षिक योजना – १९६६ ते १९६९ :-




- तिसरी योजना बऱ्याच अंशी अपयशी ठरल्यामुळे अर्थव्यवस्थेत अस्थैर्य निर्माण झाले. त्यामुळे सरकारला चौथी योजना जाहीर करता आली नाही. या काळात सरकारने पंचवार्षिक योजनेला सुट्टी देऊन १ एप्रिल १९६६ दरम्यान तीन वार्षिक योजना जाहीर केल्या. वास्तविक पाहता भारताची चौथी पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९६६ पासून सुरु व्हावयास पाहिजे होती परंतु ते शक्य झाले नाही. त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. देशाच्या वस्तुची किंमतपातळी सातत्याने वाढू लागल्यामुळे विकासाचा खर्च वाढू लागला.
२. विदेशी विनिमयाचे संकट निर्माण झाले. नियोजनासाठी विदेशी भांडवल मिळणे कठीण झाले.
३. सन १९६६ मध्ये भारतीय रुपयाचे अवमुल्यन झाले.
४. निसर्ग आणि मान्सून यांच्या लहरीपणामुळे तिसऱ्या योजनेच्या शेवटी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली.
५. सन १९६२ मध्ये चीनचे आक्रमण आणि १९६५ मध्ये पाकिस्तानचे भारतावरील आक्रमण या दोन घटनांमुळे विकास कामावर वाईट परिणाम झाला.

- **संरक्षण खर्चात मोठया प्रमाणावर वाढ करण्यात आली.**

वरील सर्व अडचणीमुळे योजना मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रस्तावानुसार चौथ्या योजनेचा कार्यक्रम काही काळाकरीता थांबविण्यात आला होता.

- **तीन वार्षिक योजनांचा एकूण खर्च :-**

तीन वार्षिक योजनेत एकूण खर्च ६६३० कोटी रुपये आल्यास त्याची वर्षनिहाय विभागणी खालीलप्रमाणे :-


| | खर्च (कोटी रुपये) |
|---|---|
| १९६६ – ६७ | २१६५ |
| १९६७ – ६८ | २०८५ |
| १९६८ – ६९ | २३८० |

- तीन वार्षिक योजना काळात भाववाढ झाली परंतु १९६८ – ६९ मध्ये किंमत पातळी स्थिर राहिली. बचतीमध्ये वाढ झाली निसर्ग व मान्सूनची अनुकूलता असल्यामुळे शेतीचा हंगाम चांगला राहिला.
- सन १९६७ – ६९ मध्ये अन्नधान्ये उत्पादन ९.५ कोटी टन आणि १९६८ – ६९ मध्ये ९.६ कोटी टन झाले. या तीन वार्षिक योजना काळात निर्यातीमध्ये वाढ झालेली दिसून आली.
- १९६७ – ६८ मध्ये निर्यात ३.४ टक्क्यांनी आणि १९६८ – ६९ मध्ये १३.५ टक्क्यांनी वाढ झाली एवढेच नाही तर या काळात आयातीमध्ये घट झाल्याने दिसून आले. याच दरम्यान जून १९६६ मध्ये रुपयांचे ३६.५ टक्के अवमूल्यन करण्यात आले होते.

## ➢ चौथी पंचवार्षिक योजना – (१९६९ ते १९७४) :-



श्रीमती इंदिरा गांधी




- अध्यक्ष : श्रीमती इंदिरा गांधी
- उपाध्यक्ष : धनंजयराव गाडगीळ
- कालावधी : १ एप्रिल १९६९ ते ३१ मार्च १९७४
- प्रतिमान : ॲलन, रुद्र
- मुख्य भर : आर्थिक स्वावलंबन, स्थैर्यासह आर्थिक विकास
- अपेक्षित विकास दर : ५.६ टक्के
- साध्य विकास दर : ३.३ टक्के
- घोषणा : 'गरिबी हटाओ'
- घोषवाक्य : स्थैर्यासह आर्थिक वाढ
- उपनाव : गाडगीळ योजना

Agrani Bank Limited



- **योजनेची उद्दिष्ट्ये :-**

१. राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी ५.७ टक्के वाढ करणे. अन्नधान्य उत्पादनात दरवर्षी ३.९ टक्के वाढ करुन अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करणे.


२. बचत-उत्पन्नाचे गुणोत्तर (Savings GDP Ratio) १३.२ टक्के पर्यंत वाढविणे.

| सुरु करण्यात आलेले प्रकल्प / कार्यक्रम | योजनेचे मूल्यमापन |
|---|---|
| १. जुलै १९६९ – व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण<br>२. १९६९ - अग्रणी बँक योजनेची सुरुवात<br>३. १९७२ - बोकारो (झारखंड) पोलाद प्रकल्प<br>४. १ जानेवारी १९७३ - साधारण विमा महामंडळाची (GIC) स्थापना<br>५. १९७३ - अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम (DPAP)<br>६. १९७४-७५ – लघु शेतकरी विकास प्राधिकरण (SFDA)<br>७. जानेवारी १९७३ – Steel Authority of india Ltd (SAIL)<br>८. जून १९६९ – MRTP Act - आर्थिक केंद्रीकरण रोखण्यासाठी | १. पहिल्या दोन वर्षात चांगली प्रगती, मात्र नंतरच्या तीन वर्षात अपयश आले.<br>२. या काळात १९७२-७३ मध्ये पहिल्यांदा भारताचा व्यापारतोल अनुकूल राहिला.<br>३. राष्ट्रीय उत्पन्नात प्रत्यक्षात दरवर्षी केवळ ३.३ टक्के एवढीच वाढ साध्य झाली. |

## ➢ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९) :-



श्रीमती इंदिरा गांधी




- अध्यक्ष : श्रीमती इंदिरा गांधी
- उपाध्यक्ष : धनंजयराव गाडगीळ
- मुख्य भर : दारिद्रय निर्मूलन व आत्म निर्भरता
- प्रतिमान : ॲलन व अशोक रुद्र यांच्या 'किमान मजूरी प्रतिमान' यावर आधारित होता. या प्रतिमानाचा अंतिम आराखडा डी. पी. धर यांनी तयार केला.
- अपेक्षित विकास दर : ४.४ टक्के
- साध्य विकास दर : ४.८ टक्के
- कालावधी : १ एप्रिल १९७४ ते ३१ मार्च १९७९ हा कालावधी होता. परंतु १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या व या निवडणुकीमध्ये जनता पक्षाने इंदिरा काँग्रेसचा पराभव केला. जनता पक्षाने नियोजनात आमुलाग्र बदल करण्याचा निर्णय घेतला.





- दर पाच वर्षानी नवीन पंचवार्षिक योजना बनविण्याऐवजी त्यांनी साखळी नियोजन संकल्पना स्वीकारली. नविन सरकारच्या या निर्णयामुळे पाचवी योजना ३१ मार्च १९७८ मध्येच थांबविण्यात आली.
- **उद्दिष्टे :-**

१. आर्थिक वृध्दीदर प्रतिवर्ष ४.४ टक्के साध्य करणे. कृषी उत्पादन वृध्दीदर प्रतिवर्ष ३.३ टक्के साध्य करणे
२. दारिद्रय निर्मूलन

| सुरु करण्यात आलेले प्रकल्प / योजना | योजनेचे मूल्यमापन |
|---|---|
| १. १८ मे १९७४ – पहिली अणु चाचणी, पोखरण (Code Word-Buddha Laughs)<br>२. १९७५ – वीस कलमी कार्यक्रम<br>३. १९७५ – क्षेत्रीय कलमी कार्यक्रमाची (TPP) सुरुवात<br>४. २५ जून १९७५ ते १९७७ – राष्ट्रीय आणीबाणी (देशातील ३ री)<br>५. २ ऑक्टोबर १९७५ – पहिल्या पाच प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना<br>६. १९७६-७७ – दुसऱ्यांदा भारताचा व्यापारतोल अनुकुल<br>७. १९७५-७६ - एकात्मिक बाल विकास योजना<br>८. १९७६– पहिले राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहिर<br>९. १९७६ – ४२ वी घटना दुरुस्ती<br>१०. १९७७ - कामाच्या बदल्यात अन्न योजना (FFW)<br>११. १९७८ - अंत्योदय योजना | १. या योजनेला अनिश्चिततेच्या परिस्थितीतून जावे लागले. काही क्षेत्रातील प्रगती काहीशी उल्लेखनीय राहिली.<br>२. राष्ट्रीय उत्पन्नात वार्षिक वृध्दी ४.८ टक्के साध्य झाली.<br>३. कृषी उत्पादनात प्रत्यक्षात वार्षिक वृध्दी ४.२ टक्के साध्य झाली.<br>४. प्रतिव्यक्ती उत्पन्नात दरवर्षी २.३ टक्क्यांनी वाढ झाली.<br>५. साखळी किंवा सरकती योजना (Rolling Plan)<br>६. जनता सरकारने पाचवी पंचवार्षिक योजना १९७८ च्या मार्च अखेर समाप्त करुन पुढील पाच वर्षासाठी (१९७८ ते १९८३) साखळी योजना सुरु केली. मात्र ती फक्त एप्रिल १९७८ ते जानेवारी १९८० दरम्यान राबविण्यात आली.<br>७. Rolling Plan ही संकल्पना प्रो. गुन्नार मिरडल यांनी त्यांच्या India's Economic Planning in its Broader Settings' मध्ये मांडली आहे.<br>८. साखळी योजनेची संकल्पना प्रो. रॅगनर यांनी लोकप्रिय केली. जनता पार्टीची सरकती योजना प्रो. डी.टी. लकडवाला यांनी तयार केली.<br>९. या काळात राष्ट्रीय उत्पन्नात सरासरी ४.८ टक्के वाढ साध्य झाली. |

| सुरु केलेले कार्यक्रम |
|---|
| १. १९७८ - एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) प्रायेगिक तत्वावर सुरुवात<br>२. १९७८ – Food For Work (कामाच्या बदल्यात अन्न) – देशपातळीवरील रोजगारासाठी असलेली पहिली योजना होय. २००४ – ०५ पासून या योजनेची पुन्हा अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.<br>३. १९७९ – TRYSEM<br>४. १९७९- किमान गरजा कार्यक्रम (MNP)<br>५. अंत्योदय योजना<br>६. जिल्हा औद्योगिक केंद्राची स्थापना |

## ➢ सहावी पंचवार्षिक योजना – (१९८० ते १९८५) :-



श्रीमती इंदिरा गांधी

- अध्यक्ष : श्रीमती इंदिरा गांधी (१९८० – ८१ ते १९८३ – ८४)
  राजीव गांधी ( १९८३ – ८४ ते १९८४ – ८५)
- उपाध्यक्ष : दुर्गाप्रसाद धर
- कालावधी : १ एप्रिल १९८० ते ३१ मार्च १९८५
- प्रतिमान : ॲलन, रुद्र
- मुख्यभर : दारिद्रय निर्मुलन, कृषी व ग्रामीण विकास, रोजगार – निर्मिती
- अपेक्षित विकास दर : ५.२ टक्के
- साध्य विकास दर : ५.७ टक्के
- **उद्दिष्टे :-**

१. राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ५.२ टक्के इतका संपादित करणे.
२. रोजगार निर्मिती – ३.४ कोटी संपादित करणे.
३. दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण १९८४ – ८५ साली ३० टक्के व १९९४ – ९५ साली १० टक्के पर्यंत कमी करणे.





राजीव गांधी


- **सुरु करण्यात आलेले कार्यक्रम :-**

१. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम – IRDP (Integrated Rural Development Programme) प्रत्यक्ष अंमलबजावणी – २ ऑक्टोबर १९८०
२. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम – NREP (National Rural Emplyment Programme) २ ऑक्टोबर १९८०
३. ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना कार्यक्रम – RLEGP (Rural Landless Employment Guarantee Programme) – १५ ऑगस्ट, १९८३
४. DWCRA – Development of Women an Children in Rural Areas – सप्टेंबर १९८२
५. विशाखापट्टणम पोलाद प्रकल्प – १९८३ (आंध्रप्रदेश) , सेलम पोलाद प्रकल्प – १९८३ (तामिळनाडू)
६. १५ एप्रिल १९८० – ६ बँकांचे राष्ट्रीयकरण

- **योजनेचे मूल्यमापन :-**

१. ही योजना बहुतांशी यशस्वी झाली. आर्थिक वृध्दीचा दर ५ टक्के पेक्षा अधिक मिळण्यास सुरुवात झाली.
२. कृषी व सेवा क्षेत्रात यश व उद्योग क्षेत्रात थोडे अपयश
३. या योजनेदरम्यान देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण घोषित केले.

## ➢ सातवी पंचवार्षिक योजना – (१९८५ ते १९९०) :-



राजीव गांधी

- अध्यक्ष : राजीव गांधी (डिसेंबर १९८९ पर्यंत)
  व्ही.पी. सिंग (डिसेंबर १९८९ नंतर)
- उपाध्यक्ष : मनमोहन सिंग (ऑगस्ट १९८७ पर्यंत), पी.शिवशंकर (जुलै १९८७ ते जून १९८८), माधवसिंग सोळंकी (जून १९८८ ते ऑगस्ट १९८९), रामकृष्ण हेगडे (डिसेंबर १९८९ नंतर)
- कालावधी : १ एप्रिल १९८५ ते ३१ मार्च १९९०
- प्रतिमान : ब्रम्हानंद व वकिल
- मुख्य भर : अन्न रोजगार व उत्पादकता
- अपेक्षित विकास दर : ५.०० टक्के
- साध्य विकास दर : ५.६ टक्के
- घोषणा : बेकारी हटाओ (१९८८)
- मुख्य भर : उत्पादक रोजगार निर्मिती
- 'रोजगार निर्मिती जनक' योजना म्हणतात.




- **अपेक्षित खर्च :-**

१. ऊर्जा क्षेत्र – ३०.४५ टक्के
२. शेती, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा व विशेष क्षेत्रीय कार्यक्रम – २२ टक्के
३. वाहतूक, दळणवळण, माहिती, नभोवाणी व दूरदर्शन – १६.३६ टक्के

| सुरु करण्यात आलेले कार्यक्रम | मूल्यमापन |
|---|---|
| १. १९८५ - कृषी मूल्य व व्यय आयोग (CACP), कृषी मूल्य व किंमती आयोग (१९६५ च्या कृषि मूल्य आयोगाची पूनर्रचना)<br>२. इंदिरा आवास योजना – १९८५-८६<br>३. पुनर्गठित वीस कलमी कार्यक्रम – १ एप्रिल १९८६<br>४. दशलक्ष विहीर योजना – १९८८-८९<br>५. जवाहर रोजगार योजना – १ एप्रिल, १९८९ (६ व्या योजनेतील NREP आणि RLEGP या योजनांचे एकत्रीकरण करुन ही योजना तयार करण्यात आली) | १. योजनेची बरीच उद्दिष्टे साध्य झाली.<br>२. आर्थिक वृध्दीदर – ६.०२ टक्के साध्य झाला.<br>३. दारिद्रय रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत कमी झाले. |

## ➢ वार्षिक योजना (१९९० – ९२) :-

- हा योजनेच्या सुट्टीचा दुसरा कालावधी आहे.
- कालावधी – १९९० ते १९९२ या कालावधीमध्ये पंचवार्षिक योजनांऐवजी दोन वार्षिक योजना राबविण्यात आल्या.

- **योजनेला सुट्टी देण्याचे कारण :-**

१. राजकीय अस्थैर्य – राजीव गांधीची हत्या व त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणूका
२. परकीय गंगाजळीचे (Forein Reserve) संकट, IMF कडून अल्पकालीन कर्ज घेतले गेले.
३. १९९१ – तेलाचा झटका
४. आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारण्यासाठी दबाव

- चलनवाढीचा मोठा दर (१३.७%) होता.
- उद्योग क्षेत्रात मंदी
- ३० जानेवारी १९९२ – संवैधानिक दर्जा दिला. (कायद्यानुसार १२ एप्रिल १९९२ ला स्थापना)
- १९८८ – The security and Exchange Board of India (SEBI)
- Head quarter – Mumbai

## ➢ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-१९९७) :-

- अध्यक्ष : चंद्रशेखर (जनता), पी.व्ही. नरसिंहराव (काँग्रेस)
- उपाध्यक्ष : हेगडे, धारीया, प्रणव मुखर्जी
- कालावधी : १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च १९९७
- प्रतिमान : नरसिंहराव, मनमोहन सिंग (LPG प्रतिमान)
- मुख्यभर : मनुष्यबळ विकास
- अपेक्षित विकास दर: ५.६ टक्के
- साध्य विकास दर: ६.५ टक्के
- नियोजनाचा भर: आठव्या योजनेपासून सरकारने सूचक नियोजनाचा (Indicative Planning) अवलंब केला. त्या अनुषंगाने सरकारने अर्थव्यवस्थेतील आपली भूमिका कमी करुन खाजगी क्षेत्राला जास्त वाव देण्याचे ठरविले.



पी.वी.नरसिंहराव





पंतप्रधान रोजगार योजना (PMRY) – २ ऑक्टोबर १९९३

- **योजनेपुढील संकटे :-**

१. व्यवहारतोल संकट : परकीय चलनाच्या साठ्यातील प्रचंड घट - परकीय चलन फक्त ५-६ अब्ज डॉलर्स एवढे कमी होऊन फक्त १५ दिवसांची आयात करता येण्याइतकेच होते. याच काळात आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारण्यात आले.

- **उद्दिष्टये :-**

१. लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रित करणे.
२. १५ ते ३५ वर्षे वयोगटातील सर्वांना प्राथमिक शिक्षण देऊन निरक्षरतेचे संपूर्ण उच्चाटन करणे.
३. कृषिक्षेत्राचा विकास करणे. ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, सिंचनसोयी इ. सोयी सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध करुन देणे.

- **सुरु करण्यात आलेल्या योजना :-**

१. राष्ट्रीय महिला कोष – १९९२-९३ मध्ये स्थापना
२. २ ऑक्टोबर १९९३ - i) आश्वासित रोजगार योजना
ii) पंतप्रधानांची रोजगार योजना
iii) महिला समृध्दी योजना
३. २३ डिसेंबर १९९३ - खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना
४. १५ ऑगस्ट १९९५ - i) राष्ट्रीय सामाजिक साहाय्य योजना
ii) मध्यान्न आहार योजना
iii) इंदिरा महिला योजना
५. १५ ऑगस्ट १९९६ - संगम योजना
६. १ फेब्रुवारी १९९७ - गंगा कल्याण योजना

- **सुरु करण्यात आलेले कार्यक्रम :-**

१. आश्वासित रोजगार योजना (AES) – २ ऑक्टोबर १९९३
२. पंतप्रधान रोजगार योजना (PMRY) – २ आक्टोबर १९९३

३. २३ डिसेंबर १९९३ - खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना (MPLADS)
४. १९९३ – नरसिंहम समिती - बँकींग क्षेत्रातील सुधारणा
५. १९९४ - खाजगी बँकींग क्षेत्राची सुरुवात – UTI ही भारतातील पहिली खाजगी बँक
६. १९९४ – तारापोर समिती – भारतीय रुपया चालू खात्यावर पूर्णत: तर भांडवली खात्यावर अंशत: परिवर्तनीय करण्यात आला.
७. १ फेब्रुवारी १९९७ - गंगा कल्याण योजना (GKY)
८. रुपया व्यापार खात्यावर पूर्ण परिवर्तनीय
९. रुपया चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय
१०. ग्रामीण कारागिरांना सुधारित साधनांचा संच पुरविणारी योजना (SITRA –Supply of Improved Tools for Rural Artisans)
११. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (MPLADS – Members of Parliament Local Area Development Scheme)
१२. राष्ट्रीय सामाजिक सेवा योजना (NSAP – National Social Assistance Program)
१३. मध्यान्न आहार योजना (MMS – Mid day Meal Scheme)
१४. संगम योजना (SS – Sangam Scheme)

- **योजनेचे मूल्यमापन :-**

१. आठव्या योजनेत सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्राचे महत्त्व वाढल्याचे दिसून येते.
२. १९९१ पासून भारत सरकारने उदार व मुक्त आर्थिक धोरण स्विकारल्याचा हा परिणाम होता.
३. ही योजना तोपर्यंत सर्वाधिक यशस्वी ठरलेली योजना होती.
४. या योजनेत तोपर्यंतचा सर्वाधिक म्हणजे ६.६८ टक्के एवढा वाढीचा दर साध्य केला गेला.
५. कृषी उत्पादनामध्ये ३.९ टक्के वृध्दीदर साध्य झाला.

## ➢ नववी पंचवार्षिक योजना (१९९७-२००२) :-

- अध्यक्ष : एच.डी. देवेगौडा (संयुक्त आघाडी)
- अटल बिहारी वाजपेयी
- उपाध्यक्ष : के. सी. पंत
- कालावधी : १ एप्रिल १९९७ ते ३१ मार्च २००२
- प्रतिमान : गांधीवादी
- मुख्य भर : कृषी व ग्रामीण विकास
- अपेक्षित विकास दर : ६.५ टक्के
- साध्य विकास दर : ५.४ टक्के
- घोषवाक्य : सामाजिक न्याय आणि समानतेसह आर्थिक वाढ


एच.डी. देवेगौडा


अटल बिहारी वाजपेयी

- **सुरु करण्यात आलेले कार्यक्रम :-**

१. स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना – डिसेंबर १९९७
२. राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम – १९९८
३. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना – १ एप्रिल १९९९. ही योजना पुढील योजनांचे एकत्रीकरण करुन तयार केली.
४. IRDP, TRYSEM, DWCRA, MWS, SITRA व GKY (गंगा कल्याण योजना)
५. जवाहर ग्राम समृध्दी योजना – १ एप्रिल १९९९
६. अंत्योदय अन्न योजना – २५ डिसेंबर २०००
७. विशेष आर्थिक क्षेत्रे (SEZ) धोरण – २०००-०१ (प्रत्यक्ष कायदा २००५ मध्ये)
८. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना – २५ डिसेंबर २०००
९. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना – २५ सप्टेंबर २००१
१०. सर्व शिक्षा अभियान – २००१




- **योजनेचे मूल्यमापन :-**


१. प्रत्यक्ष आर्थिक वाढीचा दर – ५.५२ टक्के
२. ही योजना पुढील कारणांमुळे बऱ्याच अंशी अपयशी ठरली.
३. १९९७ चे आशियाई चलनाचे/दिवाळखोरीचे संकट
४. ओरिसाचे वादळ
५. गुजरातचा भूकंप
६. कारगीलचे युध्द


स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना

७. बचत दर/गुंतवणुकीच्या दराचे लक्ष गाठण्यात अपयश
८. योजनेचा आकार १८% कमी झाला.

## ➢ दहावी पंचवार्षिक योजना – २००२ ते २००७ :-

- अध्यक्ष : अटल बिहारी वाजपेयी
- उपाध्यक्ष : के. सी. पंत
- कालावधी : १ एप्रिल २००२ ते ३१ मार्च २००७
- प्रतिमान : गांधीवादी
- अपेक्षित विकास दर : ८.० टक्के
- साध्य विकास दर : ७.६ टक्के
- मुख्य भर : प्राथमिक शिक्षण



के. सी. पंत



अटल बिहारी वाजपेयी



अन्नधान्याच्या उत्पादनाचे लक्ष्य आतापर्यंत केवळ पहिल्या व दहाव्या योजनेतच साध्य झाले होते.

### • योजनेची उद्दिष्ट्ये :-

१. स्थूल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) प्रतिवर्षी सरासरी ८ टक्के प्रमाणे योजना काळात ४० टक्के वृध्दी घडवून आणणे.
२. महसुली उत्पन्नाचे प्रमाण जीडीपीच्या सध्याच्या ८.६ टक्के वरुन २००७ पर्यंत १०.३ टक्के पर्यंत वाढविणे.
३. प्रत्येक वर्षी १ कोटी रोजगार निर्मिती करुन योजना काळात ५ कोटी अतिरिक्त रोजगार निर्मिती करणे.
४. दारिद्रय रेषेखालील जनतेचे प्रमाण २६.१० टक्के वरुन २००७ अखेर पर्यंत २१ टक्के वर तर २०१२ पर्यंत ११ टक्के पर्यंत कमी करणे.
५. साक्षरतेचे प्रमाण २००७ पर्यंत ७५ टक्के इतपत तर २०१२ पर्यंत ८० टक्के पर्यंत वाढविणे.
६. २००७ पर्यंत ५ वर्षापर्यंतच्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षणाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे.
७. बालमृत्यूचे प्रमाण (IMR) २००७ पर्यंत ४५, तर २०१२ पर्यंत २८ प्रती हजार जीवित जन्म इतके कमी करणे.
८. मातामृत्यू प्रमाण (MMR) २००७ पर्यंत दरहजारी २ तर २०१२ पर्यंत दरहजारी १ पर्यंत कमी करणे.
९. जंगलव्याप्त प्रदेशाचे प्रमाण २००७ पर्यंत २५ टक्के तर २०१२ पर्यंत ३३ टक्के पर्यंत वाढविणे.
१०. निर्यातीत वार्षिक १५ टक्के या दराने वाढ घडवून आणणे.
११. बचतीचे प्रमाण जीडीपीच्या २६.८ टक्के पर्यंत वाढविणे.
१२. २००१ ते २०११ या दशकातील लोकसंख्या वाढीचा दर १६.२ टक्क्यांपर्यंत कमी करणे.
१३. २००७ पर्यंत सर्व मोठया नद्यांची स्वच्छता करणे.

### • योजनेचे मूल्यमापन :-

१. या योजनेचा सुरुवातीचा टप्पा वाजपेयी सरकारच्या काळात तर दुसरा टप्पा मनमोहनसिंग सरकारच्या काळात राबविण्यात आला.
२. ही आतापर्यंतची सर्वात जास्त यशस्वी योजना होय.
३. या योजना काळात आर्थिक वृध्दी दराचे लक्ष्य जवळपास पूर्णपणे साध्य झाले.
४. UPA सरकारच्या Flagship Programmes चा अंमलबजावणीला सुरुवात झाली.
५. UPA सरकारने नदीजोड प्रकल्पाची अंमलबजावणी थांबविली पण महामार्ग विकास कार्यक्रम (NHDP) पुढे चालू ठेवला.
६. चलनवाढीचा दर सरासरी ५% ठेवण्याचे लक्ष्य होते. मात्र प्रत्यक्षात तो ५.१% साध्य झाला.

### • सुरु करण्यात आलेल्या योजना :-

१. २३ जानेवारी २००४ - सामाजिक सुरक्षा प्रायोगिक योजना
२. १४ नोव्हेंबर २००४ – राष्ट्रीय कामासाठी अन्नयोजना
३. २ फेब्रुवारी २००६ – राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## ➢ अकरावी पंचवार्षिक योजना –(२००७ ते २०१२) :-


डॉ. मनमोहन सिंग

- अध्यक्ष : डॉ. मनमोहन सिंग
- उपाध्यक्ष : मॉन्टेकसिंग अहलुवालिया
- कालावधी : १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २०१२
- मुख्यभर : सर्वसमावेशक विकास

१) दारिद्रयात घट करणे व गुणात्मक व संख्यात्मक रोजगारात वृध्दी
२) कृषी विकास
३) सामाजिक क्षेत्राचा विकास
४) प्रादेशिक असमतोल दूर करणे
५) शाश्वत विकास

- ०९ नोव्हेंबर २००७ रोजी योजना आयोगाने भारताच्या अकराव्या पंचवार्षिक योजनेला मान्यता दिली. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवर २७ उद्दिष्टे निर्धारित करण्यात आलेली आहेत. ३० नोव्हेंबर २००७ रोजी अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या मसूद्याला केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिली. १९ डिसेंबर २००७ रोजी राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत अकराव्या पंचवार्षिक योजनेला मान्यता देण्यात आली.
- अकराव्या पंचवार्षिक योजनेसाठी एकूण तरतूद – ३६,४४,७१८ कोटी रुपये
- एकूण तरतुदीमध्ये केंद्र सरकारचा वाटा – २१,५६,५७१ कोटी रुपये
- राज्य सरकारचा वाटा – १४,८८,१४७ कोटी रुपये
- घोषवाक्य - अधिक जलद आणि सर्वांगीण विकासाकडे (Towards faster and more inclusive growth.)
- राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरंटी कार्यक्रमाच्या मार्फत रोजगार विस्तार करणे.
- लैंगिक असमानता कमी करणे.
- प्रत्येक गावाला टेलिफोनने जोडणे आणि २०१२ पर्यंत ब्रॉडबँडची सुविधा पुरविणे.
- वनाच्छादित प्रदेश ५ टक्क्यांनी वाढविणे.
- **उद्दिष्टे :-**

१. जलद गतीने आर्थिक विकास साध्य करणे.
२. गुणवत्तावर्धक रोजगाराची निर्मिती करणे.
३. दारिद्रयाचे प्रमाण कमी करणे.
४. आरोग्य विषयक सुविधांचा विस्तार करणे.
५. पर्यावरण संरक्षण व संवर्धन करणे.
६. लैंगिक असमतोल कमी करणे.



शिक्षण



आरोग्य


पर्यावरण


पायाभूत सुविधा

## ➢ अकराव्या योजनेतील प्रमुख इष्टांक :-

### १. उत्पन्न आणि दारिद्रय :-

- शेतीपासूनच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात प्रतिवर्षी सरासरी ४ टक्के वृध्दी दराने वाढ करणे.
- ७० दशलक्ष कामाच्या संधी उपलब्ध करणे.
- सुशिक्षितांची बेकारी ५ टक्क्याने खाली आणणे.
- असंघटित कामगारांच्या वास्तव वेतनात २० टक्के वाढ करणे.
- जीडीपी वृध्दी दर ९ टक्के साध्य करणे. २०१० मध्ये हे उद्दिष्ट ८.१ टक्क्यांपर्यंत कमी केले गेले. योजनेच्या अंतिम वर्षापर्यंत तो १० टक्क्यांच्या वरती नेवून ठेवणे.
- २०१६-१७ पर्यंत दरडोई उत्पन्न दुप्पट करणे.

### २. शिक्षण (Education) :-

- प्राथमिक शाळेतील मुलांच्या गळतीचे प्रमाण २००३-०४ मधील २५.२ टक्क्यावरुन २०११-१२ मध्ये २० टक्क्यांपर्यंत कमी करणे.
- सात आणि सात वर्षावरील व्यक्तीच्या साक्षरतेचे प्रमाण ८५ टक्क्यापर्यंत वाढविणे.
- साक्षरतेच्या बाबतीतील स्त्री-पुरुषातील फरक १० टक्के बिंदुने कमी करणे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अकराव्या योजनेच्या अखेरपर्यंत १० टक्क्यावरुन १५ टक्क्यापर्यंत वाढविणे.

### ३. आरोग्य (Health) :-

- प्रतिहजार असणाऱ्या बालकांच्या मागे बालमृत्युचे प्रमाण २८ टक्क्यापर्यंत कमी करणे.
- एकूण जननक्षमता दर २.१ टक्क्यापर्यंत कमी करणे.
- ० ते ३ वर्षे वयोगटातील मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण सध्याच्या पातळीपेक्षा निम्म्याने कमी करणे.
- स्त्रिया आणि मुली यांच्यातील रक्ताक्षय रोगांचे प्रमाण सध्याच्या पातळीपेक्षा निम्म्याने कमी करणे.
- स्त्रिया आणि मुली यांच्यातील रक्ताक्षय रोगांचे प्रमाण अकराव्या योजनेच्या अखेरपर्यंत ५० टक्क्यांनी कमी करणे.

### ४. स्त्रिया आणि मुले (Women and Children) :-

- ० ते ६ वयोगटातील लैंगिक प्रमाण २०११-१२ पर्यंत १००० : ९३५ आणि २०१६-१७ पर्यंत ९५० पर्यंत वाढविणे.
- सरकारच्या सर्व योजनांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ३३ टक्के लाभार्थी स्त्रिया व मुली असतील याची खात्री करणे.
- सर्व मुले कोणत्याही कामाच्या सक्तीशिवाय आपले सुरक्षित बालपण उपभोगतील याची खात्री करणे.

### ५. पायाभूत सुविधा (Infrastructure) :-

१. सर्व गावे आणि दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना २००९ पर्यंत वीज कनेक्शन आणि योजनेच्या अखेरपर्यंत २४ तास वीज पुरवठा करणे.
२. नोव्हेंबर २००७ पर्यंत प्रत्येक खेडे टेलीफोनने जोडणे आणि २०१२ पर्यंत सर्व खेडयांना ब्रॉडबॅन्ड जोडणी देणे.
३. १००० आणि त्याही पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वस्तीस्थानांना (डोंगराळ आणि आदिवासी) क्षेत्रात ५०० च्या वर लोकसंख्या असलेल्या क्षेत्रात सर्व हवामानात टिकू शकतील.

### ६. पर्यावरण : (Environment) :-

१. जंगल आणि वृक्षाखालील क्षेत्रात ५ टक्के बिंदुने वाढ करणे.
२. २०१६ – १७ पर्यंत ऊर्जा कार्यक्षमता २० टक्के बिंदुने वाढविणे.
३. सर्व प्रमुख शहरात २०११-१२ पर्यंत हवेची गुणवत्ता जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार साध्य करणे.

## ❖ मूल्यमापन :-

- या योजनेअंतर्गत आर्थिक विकासाचा सुधारित वृध्दीदर ८.१ टक्के निश्चित करण्यात आला होता. जो प्रत्यक्षात ७.९ टक्के इतका झाला त्या दृष्टीने ही योजना यशस्वी मानली जाते.
- मागील दोन वर्षात खाद्य पदार्थाच्या किंमतीमध्ये वाढ झाली.
- केंद्र आयोजित योजनेच्या समीक्षेकरीता आणि त्यांची संख्या कमी करण्याकरिता शिफारस करण्यासाठी श्री. बी. के. चतुर्वेदी समिती स्थापन करण्यात आली.
- अकरावी पंचवार्षिक योजनेत केंद्र आणि राज्यांद्वारे आरोग्यावर एकूण GDP च्या ९ टक्के पेक्षा कमी खर्च करण्यात आला आहे. आणि हा खर्च GDP च्या २ ते ३ टक्क्यां वाढविण्याची आवश्यकता आहे.
- अकराव्या पंचवार्षिक योजनेत RTE (Right To Education) कायदा २००९ मध्ये संमत करण्यात आला. या अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत शिक्षण देण्याची तरतूद असून ते पालकांचे कर्तव्य म्हणून निश्चित केले गेले आहे.
- या योजनेत अपुरी पायाभूत सुविधा यामुळे तीव्र विकासामध्ये सर्वात मोठी अडचण निर्माण झाली.
- या योजनेत बेरोजगारीमध्ये घट झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.
- अकराव्या योजनेच्या यशस्वीतेमध्ये सर्वात महत्त्वपूर्ण मुद्दा कृषी वृध्दीदर ४ टक्क्यांपर्यंत आणणे जे दहाव्या पंचवार्षिक योजनेत कृषी, वृध्दी, दर केवळ २.१ टक्के इतका होता.
- ही एक महत्त्वाकांक्षी योजना होती ज्यामध्ये संसाधनांना मागील योजनेपेक्षा १२५ टक्क्यांपर्यंत संसाधनांची वाढ करण्यात आली. यापैकी जवळपास ३० टक्के संसाधनांचा सामाजिक सेवांसाठी वापर करण्यात आला.

- सामाजिक सेवामध्ये ३० टक्के वाढविण्यात आला.
- या योजनेत ५० हजार मेगावॅट ऊर्जा क्षमता साध्य केली होती. आणि बाराव्या पंचवार्षिक योजनेत १ लाख मेगावॅट पर्यंत ऊर्जा क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## ➢ बारावी पंचवार्षिक योजना :-

- १५ सप्टेंबर २०१२ रोजी नियोजन आयोगाने १२ व्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम आराखडयास मंजुरी दिली तर राष्ट्रीय विकास परिषदेने योजनेच्या अंतिम मसूद्याला २० डिसेंबर २०१२ रोजी मंजुरी दिली.

- २०१२ ते २०१७ हा या योजनेचा कालावधी असून संपूर्ण योजना कालावधीमध्ये वार्षिक आर्थिक विकासदराचे उद्दिष्ट ९ टक्क्यांवरुन कमी करुन ८ टक्के निश्चित करण्यात आले. वेगवान शाश्वत व 'सर्वसमावेशक विकास' (Faster, Sustainable and inclusive Growth) हे या योजनेचे ब्रीद आहे. या योजनेचे अध्यक्ष पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग तर उपाध्यक्ष श्री मोंटेकसिंग अहलुवालिया हे आहेत.

### ➢ महत्त्वाची उद्दिष्टे :-

१. सुधारित उद्दिष्टानुसार संपूर्ण योजनाकाळात ८ टक्के आर्थिक विकासदर साध्य करणे.
२. कृषी, उत्पादन व सेवाक्षेत्रामध्ये अनुक्रमे ४ टक्के, ८ टक्के व ९ टक्के वृध्दीदर साध्य करणे.
३. प्रत्येक राज्याने ११ व्या योजनेच्या तुलनेत जास्तीचा विकासदर साध्य करणे.
४. योजना कालावधीत बिगर कृषी क्षेत्रामध्ये ५ कोटी नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे.
५. दारिद्रयरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण मागील योजनेच्या तुलनेत १० टक्के घट घडवून आणणे.
६. ० ते ६ वयोगटातील बालमृत्यूदर २५ तर माता मृत्यूदर १ प्रतिहजार जीवित जन्म पर्यंत कमी करणे.
७. स्त्री-पुरुष प्रमाण (Sex Ratio) ९५० पर्यंत वाढविणे.
८. योजना काळात पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून जीडीपीच्या ९ टक्के करणे.
९. सर्व गावांचे विद्युतीकरण तसेच सर्व गावांना बारमाही रस्त्यांनी जोडणे.
१०.ग्रामीण भागातील दुरसंचार घनता ७० (Tele Density) टक्क्यांपर्यंत वाढविणे.
११.एकूण सिंचित क्षेत्र ९ कोटी हेक्टर्स वरुन १०.३ कोटी हेक्टर्स पर्यंत वाढविणे.
१२.पुनर्विकरणीय ऊर्जा क्षमतेमध्ये ३०००० मेगावॅटची वाढ घडवून आणणे.
१३.९० टक्के कुटुंबांना बँकींग सुविधा उपलब्ध करुन देणे.
१४.२०१७ पर्यंत पूर्व व पश्चिम डेडिकेटेड फ्राईट कॉरिडॉर्स (Dedicated Freight Corridors) पूर्ण करणे.

**आत्तापर्यंत योजनांपैकी केवळ पाच योजनांमध्येच (I, V, VI, VII, VIII) आर्थिक वृध्दीचा साध्य दर लक्ष्य दरापेक्षा अधिक ठरला.**

## ❖ १२ व्या योजनेची काही वैशिष्टये :-

### अ. वृध्दिदराचे लक्ष्य :-

१. ८.२% ठरविण्यात आले आहे.
२. कृषी क्षेत्रात ४%, उद्योग क्षेत्रात ८.१% व सेवा क्षेत्रात ९.१% वृध्दीदर गाठण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.
३. प्रत्येक राज्याला ११ व्या योजनेपेक्षा सरासरी जास्त वृध्दीदर गाठण्याचे उद्दिष्ट्य.
४. शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण ११.७४% वरुन १२.७१% वर वाढवण्याचे उद्दिष्ट्य.
५. आरोग्य व बालविकास खर्च ७.०९% वरुन ११.४५% करणार.

### ब. दारिद्रय व बेरोजगारी :-

१. १२ व्या योजनेअखेर दारिद्रयाचे प्रमाण १०% ने कमी करणे.
२. कौशल्यविकास - गैरकृषी क्षेत्रात (Non agri sectors) ५०.३ दशलक्ष रोजगारनिर्मिती
३. कौशल्य विकासावर भर देण्यासाठी NSDA (National Skill Development Authority) व त्या अंतर्गत राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान (National Skill Development mission)

### क. शिक्षण :-

१. शाळेत जाण्याचे सरासरी वय ७ वर्षे करणे.
२. शिक्षणातील सामाजिक व लैंगिक असमानता दूर करणे.

३. साक्षरता ८०% च्या वर नेणे. शिक्षणातील पटनोंदणी ९०% व उच्च माध्यमिक शिक्षणातील ६५% करणे.
४. दुसरीच्या विद्यार्थ्यांना वाचन व ससंख्यता येणे आणि ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वैचारिक क्षमता, अभिव्यक्तिकला व प्रश्ननिरसनाची कला अवगत करण्याचा प्रयत्न.
५. सर्व शिक्षा अभियान – सर्वाधिक खर्च – शाळा, रहिवासी शाळा, नवीन वर्गखोल्या, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये उभारणे.

### ड. आरोग्य-क्षेत्रातील लक्ष्य :-

१. शिशु मृत्यूदर २५, माता मृत्यूदर व जननदर २.१ वर आणणे.
२. ० ते ६ वयोगटातील लिंगगुणोत्तर ९५० वर आणणे.
३. ० ते ३ वयोगटातील मुलांतील कुपोषणाचे प्रमाण निम्म्यावर आणणे.
४. वैश्विक आरोग्य सेवा पुरविणे (Universal Helth Care)
५. ‘राष्ट्रीय ग्रामीण’ आरोग्य अभियान शहरांपर्यंत पोहोचवून त्याचे राष्ट्रीय अभियान (National Health Mission) असे बृहत रुपांतर करणे.

### इ. पायाभूत सुविधा (Infrastructure) :-

१. पूर्व व पश्चिम Dedecated freight corridor पूर्ण करणे.
२. पायाभूत सुविधांवरील खर्च ९% पर्यंत नेणे.
३. सर्व खेडयांना वीजपुरवठा करणे व खेडी बारमाही रस्त्यांना जोडणे. ग्रामीण भागात टेलिडेन्सिटी ७०% पर्यंत नेणे.
४. २०१७ अखेर २६००० mw वीजवृध्दी, १२० कोटी टेलिफोन कनेक्शन, १७.५ कोटी ब्रॉडबॅन्ड कनेक्शन देणे अपेक्षित.
५. शहरी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी JNNURM हा राजीव आवास योजनेचा दुसरा टप्पा राबविला जाईल.

### ई. पर्यावरण व शाश्वतता :-

१. नद्या स्वच्छता लक्ष्ये - प्रदूषित - ८०% नद्या २०१७ अखेर स्वच्छ करणे.
२. प्रदूषित - १००% नद्या २०२० अखेर स्वच्छ करणे.
३. वनाच्छादित प्रदेशात दरवर्षी १ मिलियन हेक्टरची वाढ करणे.
४. २००५ मधील प्रदूषकांच्या उत्सर्जनात २०२० पर्यंत २०% ते २५% घट आणणे.

## ❖ भारतीय नियोजनाचे मूल्यमापन :-

### • नियोजनाचे यश :-

१. राष्ट्रीय व प्रतिव्यक्ति उत्पन्नात वाढ
२. कृषीक्षेत्राचा विकास
३. औद्योगिक विकास
४. अन्नधान्यात स्वयंपूर्णता
५. पायाभूत सुविधा जलसिंचन, हवाई वाहतूक, राष्ट्रीय महामार्ग, बंदरे, रेल्वे विकास
६. निर्यातीत प्रचंड वाढ
७. सरासरी आयुर्मानात वाढ
८. विज्ञान – तंत्रज्ञान व आण्विक कार्यक्रमाचे यश

### • नियोजन अपयश :-

१. दारिद्र्य हटविण्यात आलेले अपयश
२. सर्व लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकला नाही
३. उत्पन्नाचे असमान वितरण
४. आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण कमी झाले नाही
५. भूमी सुधारणा करण्यात आलेले अपयश
६. राज्याराज्यातील प्रादेशिक असमतोल

## ❖ राज्य स्तरीय नियोजन :-

- राज्य स्तरावर ‘राज्य नियोजन मंडळाचे’ अध्यक्ष हे राज्याचे मुख्यमंत्री असतात. पूर्ण वेळ काम करणाऱ्या एका कार्यकारी अध्यक्षाची (उपाध्यक्ष) नेमणूक केली जाते. तसेच काही कॅबिनेट मंत्री व तांत्रिक तज्ज्ञांची नेमणूक राज्य नियोजन मंडळात केली जाते.

१. राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष (मुख्यमंत्री)
२. कार्यकारी अध्यक्ष (उपाध्यक्ष )
३. शासकीय सदस्य - कॅबिनेट मंत्री
४. अशासकीय सदस्य - अर्थकारण, बँकिंग, कृषी व सिंचन, उद्योग व ऊर्जा, नगर विकास, आदिवासी मागासवर्गीयांचे कल्याण, शिक्षण व आरोग्य क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती.
५. सदस्य – राज्याचे मुख्य सचिव, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभागाचे सचिव,
६. सदस्य – सचिव – नियोजन विभागाचे प्रधान सचिव

## राज्य नियोजन मंडळाची कार्ये (कार्यकारी अध्यक्षांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या)

- राज्य नियोजन मंडळ स्थापना १९७२ साली झाली.
- १९९५ पासून या मंडळाचे पुनर्गठण करण्यात आले.
- राष्ट्रीय विकास परिषदेचे निर्णय व मार्गदर्शक तत्वे यांच्या संदर्भात राज्य योजनेतील अग्रक्रम व लक्षे ठरविण्याबाबत तसेच ही लक्ष्ये कालबध्द पध्दतीने साध्य करण्यासाठी अवलंबवायच्या धोरणाविषयी व नियोजनाचे तंत्र या बाबतीत शासनाला वेळोवेळी सल्ला देणे.
- योजनांतर्गत कार्यक्रमांच्या व प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे व त्यात सुधारणा करणे.
- राज्य नियोजन मंडळ स्थापना १९७२ साली झाली.
- १९९५ पासून या मंडळाचे पुनर्गठण करण्यात आले. योजनांतर्गत योजनांचे मूल्यमापन व अभ्यास करण्याबाबत सल्ला देणे व अहवाल तपासून अधिक कार्यक्षम अंमलबजावणीसाठी शिफारस करणे.
- राज्याच्या नियोजनाच्या संबंधित महत्त्वाच्या प्रश्नावर शिफारशी करणे व शासनाकडून वेळोवेळी संदर्भित करण्यात येणाऱ्या इतर बाबींवर सल्ला देणे.

# महाराष्ट्रातील पंचवार्षिक योजना

- १९५० सालापासून महाराष्ट्रात पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम, केंद्राप्रमाणेच राबविला गेला आहे. पहिल्या दोन योजना काळात महाराष्ट्र संयुक्त मुंबई प्रांतात समाविष्ट होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची पहिली पंचवार्षिक योजना म्हणजे देशाची तिसरी योजना होय. महाराष्ट्रात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून आतापर्यत एकुण पंचवार्षिक योजना आणि १९६६ ते १९६९ या काळात ३ वार्षिक योजना, १९७९ ते १९८० या काळात १ वार्षिक योजना,१९९०-९२ या काळात दोन वार्षिक योजना, अशा एकूण सहा वार्षिक योजना राबविल्या गेल्या आहेत. १ एप्रिल २००२ पासून महाराष्ट्राची दहावी पंचवार्षिक योजना सुरु झाली.

### ❖ महाराष्ट्रातील नियोजन यंत्रणा :-

महाराष्ट्रात राज्य स्तरावर नियोजन उपसमिती व राज्य नियोजन मंडळ या दोन उच्चस्तरीय संस्था आहेत. त्यांची कार्ये साधारणत: योजना आयोग किंवा राष्ट्रीय विकास परिषद यांच्या कार्यासारखीच आहेत. मुख्यमंत्री हे या दोन्ही संस्थांचे अध्यक्ष असतात. नियोजन उपसमितीचे कार्य नियोजनाबाबतच्या सर्व बाबींबाबत अंतिम निर्णय घेण्याचे असून राज्य नियोजन मंडळ ही सल्ला देणारी संस्था आहे.

### ❑ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६) :-

- पहिली पंचवार्षिक योजनेसाठी १४,६३१.३१ लाख रुपये एवढी खर्चाची तरतुद करण्यात आली होती. प्रत्यक्षात १५४.७१ कोटी रु. खर्च झाले. त्यावेळी राज्याच्या विकासासंदर्भात एकुण २३ योजना करण्यात आल्या होत्या.
- यामध्ये शेतीक्षेत्राचे उत्पादन वाढण्यासाठी ५ योजना, कारखानदारी वाढविण्यासाठी ४ योजना, वाहतुक व दळणवळणासाठी २, आरोग्य शिक्षण व इतर सामाजिक सेवेसाठी ७ अशा २३ योजना राबविल्या.

### ❑ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते १९६१) :-

- यावेळी २६,६२४.८० लाख रु. एवढ्या खर्चाची तरतुद करण्यात आली होती. पण एकुण खर्च २७७.३० कोटी रु. झाला. योजना काळात एकुण ४२० योजना राबविण्यात आल्या. यामध्ये शेती व ग्रामीण विकासाच्या १३६ योजना तसेच जलसिंचन व ऊर्जानिर्मितीच्या ५७ योजना होत्या.

### ❑ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६) :-

- तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी सुमारे ३९० कोटी रुपयांची तरतुद होती. पण प्रत्यक्ष खर्च सुमारे ४३५ कोटी रुपयांपर्यत झाला. या योजनात २२% खर्च विद्युत विकासावर करण्यात आला असला तरी सर्वात जास्त भर कृषी व संलग्न सेवा (३१%) या घटकावर होता. जलसिंचनाच्या सोयींचा विकास करण्यासाठी एकुण योजनेच्या सुमारे १५% खर्च झाला.

- या योजना काळात प्लेग या रोगाचे पुर्ण उच्चाटन करण्यात आले, तर हिवतापाचे प्रमाण बरेच कमी केले गेले. ग्रामीण व शहरी भागांमध्ये हॉस्पीटल्सची संख्या वाढविण्यात आली.

## चौथी पंचवार्षिक योजना (१९६९ ते १९७४) :-

- या योजनाकाळात महाराष्ट्रात दुष्काळ पडल्याने रोजगार आणि दुष्काळ निवारणाच्या कामावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला. या योजनेची तरतुद सुमारे १ हजार कोटी होती. प्रत्यक्षात १ हजार ५ कोटी रुपये खर्च झाले. सर्वात जास्त खर्च विद्युत निर्मितीवर (२८%) करण्यात आला. त्यानंतर कृषी व संलग्न सेवा विकास (२२%) आणि पाटबंधारे या घटकावर (१७%) खर्च करण्यात आला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपेक्षा ही योजना अडीच पटीने मोठी होती.

## पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९) :-

- या योजना काळात महाराष्ट्रात रोजगार हमी कायदा करण्यात आला. यासाठी ५० कोटी रु. खर्चाची तरतुद केली गेली. त्याचबरोबर धवल क्रांतीवर मोठ्या प्रमाणावर खर्च झाला. या योजनेपासून कृषी व ग्रामीण विकास हे दोन घटक वेगळे करण्यात आले. योजनेची सुरुवातीची तरतुद सुमारे २३४८ कोटी रुपये होती पण प्रत्यक्षात सुमारे २६६१.२२ कोटी रुपये खर्च झाले. सर्वात जास्त खर्च ऊर्जा विकासावर (३४%) करण्यात आला.
- महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे १९७३ मध्ये या योजनेचा मसुदा प्रसिद्ध केला होता. चौथ्या पंचवार्षिक योजनेपेक्षा पाचव्या पंचवार्षिक योजनेत दुप्पट खर्च करण्यात आला. पाणी पुरवठ्यासाठी १६ मोठ्या प्रकल्पांवर खर्च करण्यात आला. कारखानदारीच्या विकासासाठी 'विकास महामंडळ' स्थापन केले गेले.

## सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५) :-

- या योजनेची सुरुवातीची तरतुद ६१७५ कोटी रुपये होती. प्रत्यक्षात ती ६५३८ कोटी रुपयांपर्यत वाढविली. या योजनेतील घटकनिहाय खर्चाचा अनुक्रमे पुढीलप्रमाणे - ऊर्जाक्षेत्र (३५%), जलसिंचन (२२%), सामाजिक व सामुहिक सेवा (२८%) या योजना काळात महाराष्ट्रामध्ये एकात्मिक ग्रामीण विकास योजना, ट्रायसेम आणि संजय गांधी निराधार योजना सुरु झाली.
- राज्यातील ४८ टक्के दारिद्रयात असणाऱ्या लोकांची उन्नती करण्यासाठी प्रयत्न केले. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण घालण्यासाठी कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम राबविण्यात आले.सहकारी साखर कारखान्यांची संख्या वाढविली. साखरेचे संचालनालय अधिक विस्तृत करण्यासाठी २५ लाख रुपयांची तरतुद केली. तसेच सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी या योजनेत ५७.४४ कोटी रु. ची तरतुद केली.

## सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०) :-

- सातव्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने अडचणीच्या पार्श्वभुमीवर झाला. १९८५-८६ या दुष्काळाच्या सलग दुसऱ्या वर्षी राज्यातील ११,३४६ गावात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली होती. त्याचा परिणाम कृषी उत्पादनात घट होण्यात झाला.१९८६-८७ साली राज्याला सातत्याने तिसऱ्या वर्षी टंचाईच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले आणि २३,००० पेक्षा जास्त गावात टंचाईची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पुन्हा अन्नधान्याचे उत्पादन घटले. या योजनेसाठी १०,५०० कोटी रु. ची तरतुद होती.प्रादेशिक अनुशेष दूर करणे हे सातव्या योजनेचे एक मुलभुत वैशिष्ट होते.
- सत्यशोधन समितीने निश्चित केलेला प्रादेशिक अनुशेष आठव्या योजनेच्या अखेरपर्यंत नाहीसा व्हावा यासाठी धोरण म्हणून सातव्या योजनेत १५०० कोटी रु. ची तरतुद केलेली होती. ५.५% हा वृद्धीदर सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात गाठला गेला. या योजनेत 'नवीन सुधारित २० कलमी कार्यक्रम, १९८६ हा एप्रिल १९८७ पासून राबविण्यास सुरुवात झाली.

## आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९७) :-

- आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये राज्यासाठी १८५२०.०० कोटी रुपये एवढ्या खर्चाची तरतुद होती. संसाधनाच्या उभारणीसाठी राज्य शासनाने ६३१०.५० कोटी रुपयांची तरतुद अर्थसंकल्प आणि कर्ज उभारणीतून उभी केली. याशिवाय १४४५.१० कोटी रुपये महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून तर अन्य संस्थांकडून १५२.६५ कोटी रुपये उभारले गेले.
- ग्रामीण भागात स्थायी स्वरुपात रोजगार-निर्मिती व्हावी यासाठी शेतीचे विविधीकरण, जल संधारण, यावर भर दिला गेला. तर फळबागा विकसित करण्यासाठी २५० कोटी रुपये अशी तरतुद होती.
- या योजना काळात आदिवासी उपयोजनेसाठी १००४.९ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली. आठव्या योजनेत अन्नधान्य उत्पादनासाठी १५१.७७ लाख टन हे उद्दीष्ट ठरविले गेले.तेलबिया, कापुस आणि ऊस यांच्यासाठीचे आठव्या योजनेचे इष्टांक अनुक्रमे २७ लाख टन, २२ लाख गासड्या आणि ४२२ लाख टन असे ठरविण्यात आले होते.

## नववी पंचवार्षिक योजना (१९९७-२००२) :-

- या नवव्या पंचवार्षिक विकास योजनेचा दर ९ टक्के ठरविण्यात आला.
- या योजनेसाठी नियोजित खर्च ४५१२५ कोटी रु एवढा होता. प्रत्यक्षात ४६१३९.९० कोटी रु. खर्च या योजनेवर झाला.

## दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) :-

- महाराष्ट्राच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेचे आकारमान – ६६६३२ कोटी रुपये
- वैशिष्ट्ये :-

१. योजनाकाळात विकास दराचे उद्दिष्ट - ७.४%
२. कृषी विकास दर - ३.६%
३. उद्योग क्षेत्रातील विकास दर – ८.२२%
४. सेवाक्षेत्रातील विकास दर – ८.०९%
५. २००७ अखेर साक्षरतेचे प्रमाण ९०% पर्यत नेणे.
६. महाराष्ट्राच्या २००७-०८ च्या वार्षिक २० हजार २०० कोटी रुपयाच्या योजनेस आयोगाने मान्यता दिली.

## ❑ अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-१२) :-

- योजनेचे अध्यक्ष – पृथ्वीराज चौहान
- उपाध्यक्ष - बाबासाहेब कुपेकर
- शिर्षक – रोजगारभिमुख संतुलीत विकास
- उद्दिष्ट्ये :-

१. राज्याचा आर्थिक वृद्धी दर – १०%, कृषी वृद्धी दर – ३%, औद्योगिक क्षेत्र वृद्धी दर – १०%, सेवा क्षेत्र वृद्धी दर – १२%
२. या योजनेत जलसंधारणाला प्राधान्य देण्यात आले आहे.
३. सन २०१२ पर्यत सर्व मुलांना शिक्षण देणे व गळती रोखणे.
४. दारिद्रय रेषे खालील लोकांचे प्रमाण ८% वर आणणे.
५. बालविवाहाचे प्रमाण १/३ पर्यत कमी करणे. वृद्धीदर – ८.३% करणे.

## ❖ स्थानिक पातळीवरील नियोजन मंडळ :-

- स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारी साधनसंपत्ती आणि गरज लक्षात घेऊन त्या – त्या विभागापुरते नियोजन केले जाते. राज्यासाठी तयार केलेल्या योजनेची विधानसभेत आणि विधानमंडळात चर्चा होते आणि मंजुरी घेतली जाते. त्यानुसार प्रत्येक क्षेत्राला साधनसंपत्तीचे वितरण केले जाते. स्थानिक स्वरुपाच्या गरजांना प्राधान्य मिळते आणि त्यानुसार त्या – त्या भागाचा विकास केला जातो. स्थानिक पातळीवर आणि राज्य पातळीवर नागरिकांना उपयुक्त ठरणारे प्रकल्प हाती घेतले जातात. पाणीपुरवठा योजना सांडपाणी व्यवस्था, रस्ते बांधणी आणि दुरुस्तीकरण, विद्युतीकरण, शहर सुधारणा योजना – वृक्षारोपण, विद्युतीकरण शहर सुधारणा योजना – वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन, आरोग्य रक्षण योजना, विकासाचा कालबद्ध असा कार्यक्रम तयार करता येतो आणि विविध शहरे छोटी गावे यांचा विविधस्वरुपी विकास शक्य होतो.

## ❖ जिल्हा स्तरीय नियोजन मंडळ :-

- घटनेच्या ७४ व्या घटनादुरुस्तीने जिल्ह्यातील यंत्रणेला घटनात्मक दर्जा मिळवून दिला. या घटनादुरुस्तीने घटनेत कलम २४३ZD हे कलम नव्याने टाकण्यात आले. त्यानुसार देशातील सर्व जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. जिल्ह्यातील सर्व पंचायत संस्था व नगर परिषदांच्या योजना एकत्रित करुन जिल्हा विकास योजनेचा मसुदा तयार केला जातो व तो राज्य सरकारला सादर करण्यात येतो.

❑ **यंत्रणा :** जिल्हा नियोजन मंडळाचे अध्यक्ष जिल्ह्याचे पालकमंत्री असतात.

❑ **समितीची एकूण सदस्यसंख्या व निर्वाचित सदस्यसंख्या :-** जिल्ह्याची लोकसंख्या २० लाखांपेक्षा कमी असल्यास जिल्हा नियोजन समितीची सदस्यसंख्या ३० असते. २० ते ३० लाखांदरम्यान असेल तर ४० सदस्य व ३० लाखांपेक्षा जास्त असेल तर ५० सदस्य असतात.

❑ **पदसिद्ध सदस्य :-**

अ) पदसिद्ध अध्यक्ष – पालकमंत्री
ब) पदसिद्ध सदस्य – जिल्हा परिषद अध्यक्ष
क) पदसिद्ध सदस्य – सचिव, जिल्हाधिकारी

❑ **नियुक्त सदस्य :-**

अ) सह–सदस्य – राज्यशासनामार्फत जिल्ह्यातून निवडून आलेल्या मंत्र्यापैकी ६ मंत्री नियुक्त केले जातात.
ब) सह–सदस्य – राज्यपालामार्फत नियुक्ती
क) सह–सदस्य – राज्य विधिमंडळ व संसदेमधून दोन सदस्य
ड) सह–सदस्य शासनामार्फत जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेले २ सदस्य ४० सदस्यांच्या जिल्हा नियोजन समितीवर तर ४ सदस्य ५० सदस्यांच्या जिल्हा नियोजन समितीवर नियुक्त केले जातात.

★★★★★★★★★★★★★★★★★★★★